सीएनआरनं. एमएचएके०३००७८०२०२४

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १९.०९.२०२४ |
| नोंदणी तारीख | : | १९.०९.२०२४ |
| निकाल तारीख | : | ०१.१०.२०२५ |
| कालावधी | | ०१ ०० १२ |
| | | वर्ष महिने दिवस |

**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.०८ यांचे न्यायालयात, अकोला, जि. अकोला.**

**(पीठासीन अधिकारी अभिजीत एस. देशपांडे)**

(निकाल तारीख ०१ ऑक्टोबर २०२५)

**संक्षीप्त फौ. प्र. क्र.५५६४/२०२४**

**निशाणी ३६**

प्रथम खबरीचा तपशील

अपराध क्रमांक : ----

पोलीस स्टेशन : ----

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | : | निधी सेल्स कॉर्पोरेशन<br>तर्फे प्रोप्रायटर<br>श्री. निशांत रंगलाल लोहिया<br>वय – ५८ वर्षे, व्यवसाय– व्यापार<br>रा. शासकीय दुध डेअरी समोर, मुर्तीजापूर रोड, अकोला, ता. जि. अकोला. |
| वकिलांचे नाव | : | श्री. जी. आर. परियाल |
| | | |
| | | ड्रीम कन्स्ट्रक्शन,<br>तर्फे प्रोप्रायटर<br>श्री. प्रदीप अशोक राठोड,<br>वय – ४५ वर्षे, व्यवसाय – व्यापार<br>रा. – १/१४, कोठारी वाटिका नं. ३, विष्णू बाजर सुपर शॉपी, मलकापूर, अकोला, ता.जि. अकोला. |
| वकिलांचे नाव | : | श्री. शुभम चौधरी |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०२.०८.२०२४ |
| प्रथम खबरीची तारीख | – |
| दोषारोपपत्र/फिर्याद दाखल तारीख | १८.०९.२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चीतीची तारीख | २९.०४.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०१.०७.२०२५ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०१.१०.२०२५ |
| निकालाची तारीख | ०१.१०.२०२५ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | ०१.१०.२०२५ |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | दोषी अथवा निर्दोष मुक्तता | शिक्षेबाबत विवरण | न्यायाधीन बंदी म्हणुन संपरीक्षे दरम्यान भोगलेला कारावास फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रदीप अशोक राठोड | २९.०४.२०२५ | २९.०४.२०२५ | १३८ निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट | आरोपीला दोषी धरण्यात आले | तीन महिने साधा कारावास व रु.१,२०,०००/- नुकसान भरपाई | लागु नाही. |

## फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालयामार्फत तपासलेल्या साक्षदाराची यादी.

**अ. फिर्यादीपक्षाचे साक्षदार :**

| क्रमांक | नाव | साक्षदाराचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | श्री. निशांत रंगलाल लोहिया | फिर्यादीतर्फे साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षदार :**

| क्रमांक | नाव | साक्षदाराचा प्रकार |
|---|---|---|
| | साक्षीदार तपासलेले नाहीत. | |

**क. न्यायालयाचे साक्षदार :**

| क्रमांक | नाव | साक्षदाराचा प्रकार |
|---|---|---|
| | साक्षीदार तपासलेले नाहीत. | |

## फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय यांच्या निशाण्या.

**अ. फिर्यादीपक्षाच्या निशाण्या :**

| क्रमांक | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी १६ व १७ | बिल क्र. ८३५ व ८४० |
| २ | निशाणी १८ | धनादेश |
| ३ | निशाणी १९ व २० | Debit Advice व मेमो |
| ४ | निशाणी २१ | नोटीस |
| ५ | निशाणी २२ व २३ | पोस्टाच्या पावत्या |
| ६ | निशाणी २४ व २५ | नोटीस |

**ब. बचावपक्षाच्या निशाण्या :**

| क्रमांक | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| | काही नाही. | |

**क. न्यायालयाच्या निशाण्या :**

| क्रमांक | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| | काही नाही. | |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी घोषित)

प्रस्तुत फिर्याद ही परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (या पुढे 'सदर कायदा') चे कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गून्ह्यासाठी दाखल करण्यात आलेली आहे.

२. फिर्यादी यांचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, ते निधी सेल्स कॉर्पोरेशन, चे प्रोप्रायटर असून घरगुती तसेच कार्यालय व ईतर फर्निचर साहित्य ठोक व चिल्लर विक्रीचा व्यवसाय करत असून ते खाजगी संस्थांना सुद्धा साहित्य पुरवठा करतात. आरोपी हा ड्रीम कन्स्ट्रक्शन या नावाने विविध फर्निचर, साहित्यांचा शासकीय व ईतर संस्थांना पुरवठा करतो. आरोपी हा फिर्यादी यांच्याकडून वेळोवेळी त्यास आवश्यक असलेल्या कामाकरिता विविध प्रकारचे साहित्य ठोक भावामध्ये कधी नगदी तर कधी उधारी वर खरेदी करत होता

तसेच फिर्यादीस त्याचे पैसे परत करत होता. त्यामुळे आरोपी व फिर्यादीमध्ये चांगले व्यावहारिक संबंध होते. नेहमीप्रमाणे मार्च २०२४ मध्ये आरोपीने फिर्यादीकडुन डस्टबिनची मागणी केली व मागणी प्रमाणे फिर्यादी यांनी दि. ३०.०३.२०२४ रोजी रक्कम रुपये १,३२,८००/– चे एकूण ८०० नग डस्टबिन आरोपीस दिले. दिलेल्या साहित्याची रक्कम काही दिवसांनी देण्यात येईल असे आरोपीने फिर्यादी यांना कळविले.

३. काही दिवसांनी फिर्यादी यांनी आरोपीकडे पैशांची मागणी केली असता आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर आरोपीने कायदेशीर देणे असलेल्या रकमेच्या परतफेडीकरिता दि. ०२.०५.२०२४ रोजी State Bank of India मुख्य शाखा, अकोला चा रक्कम रुपये १,३२,८००/– चा धनादेश क्र. ७२५५३५ सही करुन फिर्यादी यांना त्यांच्या निधी सेल्स कॉर्पोरेशन च्या नावे दिला. सदर धनादेश देतांना आरोपीने धनादेश वटविला जाईल असे आश्वासन दिले होते. दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून फिर्यादीने दि. ०२.०५.२०२४ रोजी सदर धनादेश वटण्यासाठी लावला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याकारणाने तो न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादीने दि. २९.०७.२०२४ रोजी आरोपीस नोंदणीकृत डाकेद्वारे वकिलांमार्फत नोटीस पाठविली होती मात्र अपुर्ण पत्ता या शे–यासह सदर नोटीस परत आली. आरोपीस नोटीसची अंतिम सुचना दि. ०२.०८.२०२४ रोजी देण्यात आली होती. आरोपीस नोटीसची सुचना मिळून देखील आरोपीने नोटीस मधील मागणीची पूर्तता केली नाही व नोटीसला कुठलेही उत्तर दिले नाही. त्यामुळे फिर्यादी यांना प्रस्तुत प्रकरण दाखल करणे भाग झालेले आहे.

४. आरोपीला निशाणी १२ प्रमाणे गुन्ह्याचा मजकूर समजावून सांगितला व त्याचे निवेदन नोंदविलेले आहे. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन प्रकरण पुढे चालविण्याची विनंती केलेली आहे.

५. आरोपी हा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (यापुढे थोडक्यात 'फौ.प्र.सं.') चे कलम ३१३ चा जबाब नोंदविण्यास टाळाटाळ व विलंब करीत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या **Prakash Chimanlal Sheth Vs. T Ramalingam Nadar @ Ramalingam Thirivium Nadar and others, Cri. Application No.490/2020**

**Decided on 14.09.2022 व Navneet Gogia Vs. The State of Maharashtra, 2025 BHC AS 3054** या न्यायनिवाड्यांच्या आधारे आरोपीचा कलम ३१३ अन्वयेचा जबाब नोंदविण्यात आला नाही. फिर्यादीने पुरसिस निशाणी ३० प्रमाणे पुरावा बंद केला आहे.

६. फिर्यादीच्या व आरोपीच्या सुविद्य विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

७. फिर्यादीचा युक्तिवाद व अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन माझ्यासमक्ष खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष हे कारणमीमांसेसह खालील प्रमाणे आहेत–

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादी हे सिद्ध करतो काय की, त्यांनी परक्राम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ मधील सर्व पूर्व अटींची पूर्तता केलेली आहे ? | **होय.** |
| २. | फिर्यादी हे सिद्ध करतो काय की, आरोपीने कायदेशीर देणे असलेल्या रकमेच्या परतफेडीकरिता दि. ०२.०५.२०२४ रोजी State Bank of India मुख्य शाखा, अकोला चा रक्कम रुपये १,३२,८००/–चा धनादेश क्र. ७२५५३५ फिर्यादीस दिला होता व तो अनादरित झाला ? | **होय.** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपीला दोषी धरण्यात येत आहे.** |

**<u>निष्कर्षासाठीची कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ करिता</u> :**

८. परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ व १४२ चे संयुक्त अवलोकन केले असता कलम १३८ खाली गुन्हा सिद्ध करण्यासाठी फिर्यादीने खालील बाबी सिद्ध करणे आवश्यक आहे–

१. आरोपीने दिलेला धनादेश फिर्यादीने तीन महिन्यांच्या आत किंवा धनादेशाच्या वैधतेच्या आत वटण्यासाठी भरला आहे.

२. सदर धनादेश न वटता परत आलेला आहे.

३. धनादेश न वटता परत आल्यापासून ३० दिवसाच्या आत फिर्यादीने धनादेशातील रक्कमेची मागणी करणारी नोटीस आरोपीस दिलेली आहे.

४. नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आरोपीने धनादेशाची रक्कम फिर्यादीस दिली नाही तर एक महिन्याच्या आत फिर्याद दाखल केलेली आहे.

**९.** फिर्यादीपक्षातर्फे सा.क्र.१ निशांत रंगलाल लोहिया यांनी निशाणी १५ प्रमाणे त्यांच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राद्वारे साक्ष दिली आहे की, ते निधी सेल्स कॉर्पोरेशन चे प्रोप्रायटर असून ते घरगुती तसेच कार्यालय व ईतर फर्निचर साहित्य ठोक व चिल्लर विक्रीचा व्यवसाय करत असून ते खाजगी संस्थांना सुद्धा साहित्य पुरवठा करतात. आरोपी हा ड्रीम कन्स्ट्रक्शन या नावाने विविध फर्निचर, साहित्यांचा शासकीय व ईतर संस्थांना पुरवठा करतो. आरोपी हा फिर्यादी यांच्याकडून वेळोवेळी त्यास आवश्यक असलेल्या कामाकरिता विविध प्रकारचे साहित्य ठोक भावामध्ये कधी नगदी तर कधी उधारी वर खरेदी करत होता तसेच फिर्यादीस त्याचे पैसे परत करत होता. त्यामुळे आरोपी व फिर्यादीमध्ये चांगले व्यवहारिक संबंध होते. मार्च २०२४ मध्ये आरोपीने फिर्यादीकडुन डस्टबिनची मागणी केली व मागणी प्रमाणे फिर्यादी यांनी दि. ३०.०३.२०२४ रोजी रक्कम रुपये १,३२,८००/– चे एकूण ८०० नग डस्टबिन आरोपीस दिले. दिलेल्या साहित्याची रक्कम काही दिवसांनी देण्यात येईल असे आरोपीने फिर्यादी यांना कळविले. त्यावरुन फिर्यादी यांनी आरोपीकडे पैशांची मागणी केली असता आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर एप्रिल २०२४ मध्ये आरोपीने कायदेशीर देणे असलेल्या रकमेच्या परतफेडीकरिता दि. ०२.०५.२०२४ रोजीचा State Bank of India मुख्य शाखा, अकोला चा रक्कम रुपये १,३२,८००/–चा धनादेश क्र. ७२५५३५ सही करुन फिर्यादी

यांना त्यांच्या निधी सेल्स कॉर्पोरेशन येथे दिला. सदर धनादेश देतांना आरोपीने धनादेश वटविला जाईल असे आश्वासन दिले होते.

**१०.** आरोपीने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून फिर्यादीने दि. ०२.०५.२०२४ रोजी सदर धनादेश वटण्यासाठी लावला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याकारणाने न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादीने दि. २९.०७.२०२४ रोजी आरोपीस नोंदणीकृत डाकेद्वारे वकिलांमार्फत नोटीस पाठविली होती मात्र अपुर्ण पत्ता या शे–यासह सदर नोटीस परत आली. आरोपीस नोटीसची अंतिम सुचना दि. ०२.०८.२०२४ रोजी देण्यात आली होती. आरोपीस नोटीसची सुचना मिळून देखील आरोपीने नोटीसची पूर्तता केली नाही व नोटीसला कुठलेही उत्तर दिले नाही.

**११.** निशाणी १८ कडील धनादेश हा दि.०२.०५.२०२४ रोजीचा आहे. तसेच निशाणी २० कडील धनादेश परतीच्या मेमोचे अवलोकन करता निशाणी १८ कडील धनादेश हा Funds Insufficient या शेऱ्यानिशी न वटता परत आलेला आहे. सदर निशाणी २० कडील धनादेश परतीच्या मेमोला परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ चे कलम १४६ अन्वये प्रथमदर्शनी पुरावा असल्याचे मानण्यात आलेले आहे. कलम १४६ अन्वये जेव्हा बँकेचे अधिकृत चिन्ह व शिक्का असलेला तसेच संगणकीकृत धनादेश परतीचा मेमो न्यायालयात हजर केला जाईल ज्यावरुन धनादेश न वटता परत आला आहे असे विधीत होईल, तेव्हा जोपर्यंत विरुध्द बाब सिद्ध होत नाही तोपर्यंत धनादेश अनादरीत झाल्याबाबत गृहितक आहे. परक्राम्य संलेख अधिनियमाचे कलम १४६ मध्ये दिलेल्या गृहितकाप्रमाणे निशाणी २० कडील धनादेश परतीचे मेमोवरुन संबंधीत बॅकेमध्ये आरोपीचे खाते होते व निशाणी १८ कडील धनादेश वटण्यासाठी भरला असता तो Funds Insufficient या कारणास्तव न वटता परत आला होता याबाबी सिद्ध होत आहेत. त्यामुळे एकूणच निशाणी १८ कडील धनादेश वैध मुदतीत वटण्यासाठी भरला होता व तो न वटता परत आला होता हे अभिलेखावर आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन सिद्ध होत आहे असे माझे मत आहे. तसेच निशाणी १६ व १७ याचे अवलोकन केले असता सदरचे बिलांवर आरोपी व फिर्यादी यांची सही असून आरोपीने फिर्यादीकडून रक्कम रुपये १,३२,८००/– चे साहित्य विकत घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे वादातील व्यवहार हा

फिर्यादीने निशाणी ०१ व पुराव्याचे शपथपत्र निशाणी १५ यात कथन केल्याप्रमाणे असल्याचे सिद्ध होते.

**१२.** निशाणी १८ कडील धनादेश हा दि.०३.०५.२०२४ रोजी न वटता परत आल्यावर फिर्यादीने आरोपीस दि.२९.०७.२०२४ रोजी निशाणी २१ कडील नोटीस पाठविल्याचे सरतपासात कथन केलेले आहे. त्या पुष्ठयर्थ त्यांनी निशाणी २२ व २३ कडील पोस्टाच्या पावत्यांवर भिस्त ठेवलेली आहे. तसेच आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्याने त्यास नोटीस निशाणी २१ फिर्यादीने पाठविली नसल्याचे व त्यास मिळाली नसल्याबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीने आरोपीला वैध मुदतीत रक्कम मागणी करणारी नोटीस पाठविली होती व सदर नोटीसची सुचना आरोपीस नोटीसची सुचना मिळून देखील आरोपीने नोटीसची पूर्तता केली नाही व नोटीसला कुठलेही उत्तर दिले नाही हे सिद्ध होत आहे.

**१३.** एकूणच वरील सर्व विवेचनातून फिर्यादीने निशाणी १८ कडील धनादेश विहीत मुदतीत वटण्यासाठी भरला, तो धनादेश Funds Insufficient या कारणास्तव न वटता परत आला, त्याप्रमाणे फिर्यादीने आरोपीस रक्कम मागणीची नोटीस विहीत मुदतीत दिली व आरोपीने धनादेशाची रक्कम फिर्यादीस दिली नाही याबाबी अगदी स्पष्टपणे सिद्ध होत आहेत. तसेच फिर्यादीने प्रस्तुत फिर्याद विहीत मुदतीत दाखल केल्याचे अभिलेखावरुन स्पष्ट होत आहे. त्यामुळे सदर कायद्याचे कलम १३८ मध्ये असणाऱ्या सर्व पुर्व अटींची फिर्यादीने पुर्तता केलेली आहे असे माझे मत आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष **'होकारार्थी'** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करिता** :

**१४.** फिर्यादीपक्षाची थोडक्यात केस अशी आहे की, आरोपीने घेतलेल्या साहित्याच्या रकमेच्या परतफेडीकरिता फिर्यादी यांना वादातील धनादेश निशाणी १८ हा कायदेशीर जबाबदारी पोटी दिला होता. फिर्यादीने त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्राद्वारे उपरोक्त कथनांच्या अनुषंगाने साक्ष दिलेली आहे. फिर्यादीने त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ निशाणी १६ व १७ प्रमाणे ड्रीम कन्स्ट्रक्शन च्या नावे असलेल्या दोन बिलांच्या प्रती

दाखल केल्या आहेत सदर बिलांचे अवलोकन केले असता फिर्यादीने आरोपीस २५ लिटरची एक डस्टबिन किंमत १४०.६७/– रुपये प्रमाणे निशाणी १६ व १७ प्रमाणे प्रत्येकी ४०० नग असे एकूण ८०० नग दिले असून बिलाच्या रकमेवर GST आकारून प्रत्येकी ६६,४००/– रुपयांची दोन बिले दिलेली आहेत. सदर बिलांवर निधी सेल्स कोर्पोरेशन तर्फे फिर्यादीची व डस्टबीन प्राप्त झाल्याबाबत आरोपीची सही असल्याचे दिसून येते. फिर्यादीने त्याचे उलटतपासादरम्यान निशाणी १६ व १७ हे आरोपीने माल नेला त्यादिवशी तयार केले नसून त्यानंतर तयार केले असल्याचे मान्य केले आहे. परंतू आरोपीने त्यास फिर्यादीकडून ८०० नग डस्टबिन मिळाले नसल्याचे कुठेही नाकारलेले नाही. तसेच फिर्यादीने उलटतपासादरम्यान त्याने आरोपीस ८०० नग डस्टबिन एकाच दिवशी दिल्याचे देखील सांगितले आहे. त्यामुळे फिर्यादी व आरोपी यांच्यादरम्यान व्यवहार झाल्याचे सिद्ध होते.

**१५.** निशाणी १८ कडील धनादेश हा फिर्यादीच्या ताब्यात आरोपीकडून आलेला असून तो फिर्यादीने बॅकेमध्ये वटण्यासाठी भरलेला आहे. फिर्यादीने त्याच्या उलटतपासादरम्यान धनादेश निशाणी १८ वटविण्यास लावण्यापूर्वी आरोपीस त्याबाबत विचारले असल्याचे व धनादेश लावण्यापूर्वी आरोपीने त्याला कोणतीही रक्कम दिली नसल्याचे सांगितले आहे. फिर्यादीने त्याच्या उलटतपासादरम्यान धनादेश निशाणी १८ यावरील आरोपीची सही ही वेगळ्या पेनानी केली असून ईतर मजकूर वेगळ्या पेनाने लिहिला असल्याचे मान्य केले आहे. परंतू आरोपीने वादातील धनादेशाचा फिर्यादीने दुरुपयोग केल्याचे कुठेही कथन केलेले नाही. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटपतासाचे अवलोकन केले असता त्याने वादातील व्यवहार व त्यापोटी दिलेला धनादेश यास कुठेही नाकारलेले नाही. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता दोषारोपाचा तपशील निशाणी १२ आरोपीस वाचून दाखविला असता त्याने गुन्हा नाकबूल केला आहे परंतू प्रकरण प्रलंबित असतांना निशाणी २७ प्रमाणे संयुक्त पुरसीस दाखल करुन तो फिर्यादीस रुपये १,१०,०००/– किश्तीने व ठरल्याप्रमाणे देण्यास तयार असल्याचे कथन केले आहे. यावरुन देखील आरोपीने फिर्यादीकडून माल घेतल्याचे व त्याने केलेला गुन्हा मान्य केल्याचे दिसून येते.

**१६.** प्रस्तुत प्रकरणामधे फिर्यादीने त्यांच्या तोंडी व लेखी पुराव्याद्वारे त्यांची बाजु सिध्द केली आहे असे माझे मत आहे. निशाणी १६ व १७ याचे अवलोकन केले असता आरोपीने फिर्यादीकडून रक्कम रुपये १,३२,८००/– चे साहित्य विकत घेतले असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत कलम ११८ व १३९ मधील गृहितकाचे खंडन करण्याची जबाबदारी आरोपीची आहे. सदर गृहितकांचे खंडन करण्यासाठी आरोपी स्वतः साक्षीदाराचे पिंजऱ्यात येवुन साक्ष देवु शकतो अथवा फिर्यादीच्या उलटतपासातुन व अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्यावरुन खंडन करु शकतो. मात्र आरोपीने फिर्यादीच्या घेतलेल्या उलटतपासावरून देखील विशेष काही निष्पन्न झालेले नाही. तसेच आरोपीने त्यास बचावाची संधी उपलब्ध असतांना देखील स्वतःचा, साक्षीदाराचा अथवा कोणताही कागदोपत्री पुरावा त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ दाखल केलेला नाही. तसेच निशाणी ०१ व ३१ वर पारित केलेला आदेश रद्द होवून मिळण्याची विनंती देखील आरोपीने केलेली नाही.

**१७.** एकूणच फिर्यादीने आरोपीला रक्कम रु.१,३२,८००/– रुपयांचे ८०० नग डस्टबिन बिल निशाणी १६ व १७ प्रमाणे दिले होते व त्याच्या परतफेडीकरिता आरोपीने फिर्यादीला वादातील धनादेश दिला होता व तो अनादरीत झाल्याचे सिद्ध होत आहे. याउलट आरोपीने सदर कायद्याचे कलम ११८ व १३९ मधील गृहितकांचे खंडन करण्यासाठी अभिलेखावर कोणताही पुरावा सादर केला नाही. त्यामुळे वादातील धनादेश हा कायदेशीर दायित्वापोटी दिला होता हे सिद्ध होते. सबब, मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष **'होकारार्थी'** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करिता</u> :**

**१८.** मुद्दा क्रमांक १ व २ च्या विवेचनावरुन आरोपीने परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केलेला आहे हे निर्विवादपणे सिद्ध होत आहे. त्यामुळे आरोपीस कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयासाठी दोषी धरण्यात येत आहे.

**१९.** आरोपी हा प्रस्तुत प्रकरणामध्ये अनेक दिवसांपासून गैरहजर आहे. फिर्यादीने आरोपीची उपस्थिती सुरक्षित करण्यासाठी अनेक प्रयत्न केलेले आहेत. मात्र त्यात फिर्यादीला यश आलेले नाही. प्रस्तुत प्रकरण हे सन २०२४ पासुन प्रलंबीत असून फिर्यादी न्यायाच्या प्रतिक्षेत आहे. या ठिकाणी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या **Prakash Chimanlal Sheth Vs. T Ramalingam Nadar @ Ramalingam Thirivium Nadar and others, Cri. Application No.490/2020 Decided on 14.09.2022** या न्यायनिर्णयातील अभिमताचे अवलोकन करणे आवश्यक आहे. या प्रकरणामध्ये देखील आरोपी वारंवार अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले आहे. या परिस्थितीमध्ये मा. उच्च न्यायालयाने असे निरिक्षण नोंदविले की जेव्हा आरोपी स्वतः गैरहजर राहतो आणि सुनावणीदरम्यान त्याला असणाऱ्या अधिकारांचा वापर करण्यास तयार नसतो त्यावेळी प्रकरणाची कार्यवाही थांबविण्यात काहीही अर्थ नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब न नोंदविता प्रकरण पुढे चालु ठेवण्याचा आदेश पारित केलेला आहे.

**२०.** प्रस्तुत प्रकरणामध्ये देखील आरोपी हा गैरहजर आहे. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे फिर्यादीने आरोपीला उपस्थित ठेवण्यासाठी अनेक प्रयत्न केलेले आहेत. मात्र त्यात फिर्यादीला यश आलेले नाही. अशा परिस्थितीत आरोपीच्या अनुपस्थितीत त्यास शिक्षा होउ शकते काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. या ठिकाणी मा. गुजरात उच्च न्यायालयाचे **Ishwarbhai Hirabhai Chunara Vs. State of Gujrat, Decided on 22.02.2017** या न्यायनिर्णयातील अभिमताचे अवलोकन करणे उपयुक्त ठरेल. सदर प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयासमोर असा मुद्दा होता की न्यायनिर्णय घोषित करण्याच्या दिवशी आरोपी गैरहजर असल्यास सदर न्यायनिर्णय फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ३५३ अन्वये अवैध होईल काय? मा. गुजरात उच्च न्यायालयाने सदर प्रकरणात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २०५, ३१७, ३५३ व ३८९ चा उहापोह करुन असे अभिमत नोंदविले की आरोपीच्या गैरहजेरीत न्यायनिर्णय दिल्याने असा न्यायनिर्णय अवैध ठरत नाही.

२१. वर नमूद **Prakash Sheth** व **Ishwarbhai Chunara** या प्रकरणातील न्यायनिर्णयांवरुन प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीच्या गैरहजेरीत न्यायनिर्णय देता येईल असे माझे मत आहे. आरोपीला शिक्षेच्या मुद्द्यावर बोलण्याचा अधिकार होता, मात्र त्याने गैरहजर राहून तो अधिकार स्वतः गमावलेला आहे. अशा परिस्थितीत प्रकरण पुढे प्रलंबित ठेवणे संयुक्तीक नाही असे या न्यायालयाचे स्पष्ट मत आहे.

२२. फिर्यादीचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी युक्तिवादादरम्यान असे कथन केले की, आरोपीने हेतूपुर्वक सदरचा गुन्हा केलेला आहे. त्यामुळे त्याला जास्तीत जास्त शिक्षा व दंड करण्यात यावा.

२३. प्रस्तुत गुन्हा आर्थिक स्वरुपाचा आहे. तसेच फिर्यादीने पाठविलेली नोटीस मिळाल्यावर अथवा प्रस्तुत खटल्याचे समन्स प्राप्त झाल्यावर धनादेशाच्या रकमेची परतफेड करण्याची संधी आरोपीकडे होती. परंतु त्याने तसे केलेले नाही. त्यामुळे त्याला परिवीक्षा अधिनियमाचे तरतूदीचा फायदा देणे उचित होणार नाही असे या न्यायालयाचे मत आहे.

२४. सदर कायद्याचे कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यास दोन वर्षांपर्यंतच्या कारावसाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा आहे. सदर कायद्याचा उद्देश हा परक्राम्य संलेखाचे संदर्भात विश्वास निर्माण व्हावा हा आहे. तसेच लोकांनी आपले दैनंदिन व्यवहारात परक्राम्य संलेखांचा जास्तीत जास्त वापर करावा व त्यांचे बद्दल विश्वासार्हता राहील यामुळे कलम १३८ ची दंडाची तरतूद कायद्यात करण्यात आलेली आहे. सबब, प्रस्तुत गुन्हयाचे स्वरुप, आरोपीचे वय, गुन्हयाची परिस्थिती व कायद्याचा उद्देश लक्षात घेता आरोपीस **तीन महिने** साध्या कारावासाची शिक्षा करणे उचित होईल असे मला वाटते.

२५. कलम १३८ अन्वये फिर्यादी धनादेशाच्या दुप्पटीपर्यंत नुकसानभरपाई मिळण्यास पात्र असतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये धनादेशाच्या तारखेपासून जवळजवळ १ वर्षाचा कालावधी गेलेला आहे. निशाणी १८ कडील धनादेश हा त्याचवेळी वटला असता तर फिर्यादीस धनादेशाची रक्कम ०१ वर्षापूर्वीच मिळाली असती. परंतु तसे झालेले नाही. तसेच फिर्यादीने त्याच्या उलटतपासादरम्यान त्याला आजपावेतो रक्कम रुपये ४०,०००/– मिळाल्याचे मान्य केले आहे. धनादेश निशाणी १८ हा रुपये

१,३२,८००/– चा असून त्यातून आरोपीने दिलेली रक्कम वळती केल्यास आरोपी कडे रुपये ९२,८००/– ईतकी रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येते. त्यामुळे खालील प्रमाणे दंड आकारणे उचित राहील असे माझे मत आहे. सबब, वादप्रश्न क्र.३ च्या निष्कर्षासाठी मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. आरोपी **प्रदीप अशोक राठोड,** यास फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २५५(२) नुसार प्रस्तुत खटल्यात परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरिता दोषी धरण्यात येते व त्याला तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा व रक्कम रु.१,२०,०००/– द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येते व त्याने दंडाची रक्कम न भरल्यास ०७ दिवस अतिरिक्त साधा कारावास भोगावयाचा आहे.

२. वरील रु.१,२०,०००/– ची द्रव्यदंडाची रक्कम फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५७(१) अन्वये फिर्यादीस नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.

३. आरोपीला उपरोक्त शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात पाठविण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४१८(२) अन्वये अजामिनपात्र वारंट काढण्यात यावे.

४. आरोपीला प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत मोफत पुरविण्यात यावी.

Digitally signed by ABHIJEET SHYAMSUNDAR DESHPANDE
Date: 2025.10.03 16:51:58 +0530

दि. ०१.१०.२०२५
अकोला

अभिजीत एस. देशपांडे
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.०८), अकोला

**CERTIFICATE**

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | Ku. S. A. Kulkarni (Steno Grade-3) |
| Court Name | : | 08th CJSD & Addl. CJM, Akola |
| Date | : | 01.10.2025 |
| Signed by Presiding Officer on | : | 01.10.2025 |
| Uploaded on | : | 03.10.2025 |